# कार्यकारी सारांश

### अ) पूर्वपिठीकाः

माननीय महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एम ई आर सी) यांनी व्दितीय नियंत्रण कालावधीसाठी (आर्थिक वर्ष २०११-१२ ते आर्थिक वर्ष २०१५-१६) बहुवर्षिय वीजदर (एम.वाय.टी.) विनियम २०११ दि.४ फेब्रुवारी २०११ रोजी प्रसिध्द केले असून सदर विनियम हे १ एप्रिल २०११ पासून लागू करण्यात आले होते. सदर बहुवर्षीय वीजदर विनियम विषयी महावितरणने चिंता व्यक्त केली होती व सदर वीजदर विनियमांची अंमलबजावणी प्रलंबित ठेवण्यासाठी विनंती अर्ज दि.२२ फेब्रुवारी २०११ रोजी मा. आयोगाकडे सादर केला होता. तसेच महावितरणने सदर विनियमांचा पुर्नविचार व्हावा यासाठीही पुरवणी विनंती अर्ज दि.२२ मार्च २०११ रोजी मा. आयोगाकडे सादर केला होता. मा. आयोगाने सदर विनंती अर्जाची सुनावणी घेऊन दि.२३ ऑगस्ट २०११ रोजीच्या आदेशानुसार (प्र.क्र. २४/२०११) महावितरणला दि. ३१ मार्च २०१३ पर्यत (म्हणजेच २ वर्षाच्या मुदतीसाठी) बहुवर्षीय वीजदर विनियमानुसार वीजदर निश्चित करण्यापासून सुट दिली आहे.

त्यानंतर मा.आयोगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय वीजदर) विनियम २०११ मध्ये दि.२१ ऑक्टोंबर २०११ रोजी सुधारणा जाहीर केली. या सुधारणे व्दारे बहुवर्षीय वीज दर विनियमानुसार दर निश्चितीपासून सुट दिलेल्या वितरण परवानाधारकास सुट दिलेल्या कालावधीसाठी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वीजदराच्या अटी व शर्ती) विनियम २००५ नुसार एकूण महसुलाची गरज व वीजदर निश्चितीकरणासाठी दरवर्षी याचिका दाखल करण्याची मुभा दिली आहे.

सध्या भारतात विद्युत क्षेत्रात असलेल्या अनिश्चित परिस्थितीमुळे वीज खरेदी, वीज विक्रीबाबत व परिणामी एकूण आर्थिक महसूलाचे योग्य अनुमान करण्यासंदर्भातील अडचणी विचारात घेऊन महावितरणतर्फे मा. आयोगाला पत्र क्र. SE/TRC/MYT FY १३-१६/२२५८ दि.२२ जानेवारी २०१४ द्वारे द्वितीय नियंत्रण कालावधीतील बहुवर्षीय विजदर याचिका सादर करण्यासंबंधी १ वर्षा करीताची मुदतवाढ मागितली आहे.

तद्नुसार, महावितरण महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विजदराच्या अटी व शर्ती) विनियम, २००५ मधील तरतुदीनुसार अचूक समायोजनासाठीची याचिका सादर करीत आहे. १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ व १ एप्रिल २०१२ ते ३१ मार्च २०१३ या कालावधीकरीता योग्य रितीने वैधानिक लेखापरिक्षकांकडून लेखापरिक्षीत केलेले वार्षिक लेखा सुध्दा महावितरण आर्थिक वर्ष २०११-१२ आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी खर्च व महसूल यांचे समायोजनेपोटी सादर करीत आहे.

### ब) आर्थिक वर्ष २०११-१२ साठीचे अंतिम अचूक समायोजनः

महावितरणच्या लेखापरिक्षित केलेल्या लेखांनुसार आर्थिक वर्ष २०११-१२ साठीची एकुण महसुलाची गरज **रु.४१,७८६** कोटी अशी निश्चित करण्यात आली आहे. वीज खरेदी, संचलन व सुव्यवस्थेविषयक खर्च, घसारा, खेळत्या भांडवलावरील व्याज, प्रोत्साहन/सवलत, समभागभांडवलावरील परतावा आणि विजेच्या विक्रीपासून मिळालेला महसुल या बाबींसाठीच्या समायोजन रक्कमेत यापूर्वी मा.आयोगाने मंजूर केलेल्या रक्कमेच्या तुलनेत बदल झाला आहे. आर्थिक वर्ष २०१०-११ चे समायोजन तसेच आयोगाने प्रकरण क्र. १९ /२०१२ संबंधी दिलेल्या आदेशानुसार मंजूर केलेल्या बाबीं आणि प्रत्यक्ष खर्चातील फरक यांचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

(रु. कोटीमध्ये)

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०११-१२ (मान्य केल्याप्रमाणे) | आर्थिक वर्ष २०११-१२ (प्रत्यक्ष) | तफावत |
|---|---|---|---|---|
| १ | वीज खरेदी खर्च - लेखा परिक्षित केलेल्या लेखांनुसार | ३१,३३४ | ३२,९२० | १,५८६ |
| १.१ | वजा : शुन्य भारनियमनसाठीचा वीज खरेदी खर्च | २१८ | २१८ | - |
| १.२ | **निव्वळ वीज खरेदी खर्च (१.२ =१-१.१)** | **३१,११६** | **३२,७०२** | **१,५८६** |
| २ | **संचलन व सुव्यवस्थेविषयक खर्च** | **३,०६३** | **३,२९५** | **२३२** |
| २.१ | कर्मचा-यांवरील खर्च | २,२०४ | २,२९९ | ९५ |
| २.२ | प्रशासन विषयक व सर्वसाधारण खर्च | २९० | ४४४ | १५४ |
| २.३ | दुरुस्ती व देखभाल यावरील खर्च | ५६९ | ५५३ | (१६) |
| ३ | घसारा, घसा-यासाठी घेतलेल्या अग्रीमसहित | १,०१४ | ८९३ | (१२१) |
| ४ | दिर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | ८०३ | ८४५ | ४२ |
| ५ | खेळते भांडवल व ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ३१७ | ७०९ | ३९२ |
| ६ | बुडित रकमेसाठीची तरतूद | ५६७ | ५९३ | २६ |
| ७ | अन्य खर्च | ९ | २८ | १९ |
| ८ | आयकर | - | १२ | १२ |
| ९ | पारेषण अनुज्ञप्तिधारकांना प्रदान केलेला पारेषण आकार | २,२०० | २,२०० | ० |
| १० | आकस्मिक खर्चासाठीच्या राखीव निधीची तरतुद | ४८ | ४८ | ० |
| ११ | प्रोत्साहन / सवलत | १५० | २३१ | ७१ |
| **१२** | **एकुण महसुली खर्च** | **३९,२८७** | **४१,५४७** | **२,२६०** |
| १३ | भाग भांडवलावरील परतावा | ८४९ | १,००९ | १६० |
| **१४** | **एकूण महसुलाची गरज** | **४०,१३६** | **४२,५५५** | **२,४१९** |
| १५ | वजा : वीजदरा  व्यतिरिक्त उत्पन्न | १,३१४ | १,२४७ | (६७) |
| १६ | वजा : वहन आकारातून मिळणारे उत्पन्न | १७ | १३ | (४) |
| १७ | वजा: क्रॉस सबसिडी सरचार्ज चे उत्पन्न | ४ | ५ | १ |
| १८ | अधिक :मागील कालावधीतील जमा /आकार | - | ७३ | ७३ |
| १९ | अधिक :आर. एल. सी .परतावा | ४४३ | ४१९ | (२४) |
| २० | अधिक: अे.एस. सी. परतावा | - | ४ | ४ |
| **२१** | **किरकोळ दरापासूनआवश्यक असणारा एकुण महसूल** | **३९,२४४** | **४१,७८६** | **२,५४२** |
| २२ | लेखा परिक्षित केलेल्या लेखां नुसार महसुल | ३८,१३५ | ३९,५४२ | १,४०७ |
| २३ | वजा: शुन्य भार नियमनासाठीच्या वीज विक्रीतून मिळणारा  महसुल | ३२१ | ३२१ | - |
| २४ | निव्वळ महसुल | ३७,८१४ | ३९,२२१ | १,४०७ |
| **२५** | **महसूलातील तूट** | **१,४३०** | **२,५६६** | **१,१३६** |

### क) आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीचे अंतिम अचूक समायोजनः

महावितरणच्या लेखापरिक्षित केलेल्या लेखांनुसार आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीची एकुण महसुलाची गरज **रु. ५०,०८९** कोटी अशी निश्चित करण्यात आली आहे. वीज खरेदी, संचलन व सुव्यवस्थेविषयक खर्च, घसारा, खेळत्या भांडवलावरील व्याज, प्रोत्साहन / सवलत, समभागभांडवलावरील परतावा आणि विजेच्या विक्रीपासून मिळालेला महसुल या बाबींसाठीच्या समायोजन रकमेत यापूर्वी मा.आयोगाने मंजूर केलेल्या रकमेच्या तुलनेत बदल झाला आहे. आर्थिक वर्ष २०१२-१३ चे समायोजन तसेच आयोगाने प्रकरण क्र. १९ /२०१२ संबंधी दिलेल्या आदेशानुसार मंजूर केलेल्या बाबीं आणि प्रत्यक्ष खर्चातील फरक यांचा सारांश पुढीलप्रमाणे आहे.

**(रु. कोटीमध्ये)**

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१२-१३ | | |
|---|---|---|---|---|
| | | (मान्य केल्याप्रमाणे) | (प्रत्यक्ष) | तफावत |
| १ | वीज खरेदी खर्च | ३७,२३८ | ३५,७३० | (१,५०८) |
| २ | **संचलन व सुव्यवस्थेविषयक खर्च** | ३,३६३ | ४,१९३ | ८३० |
| २.१ | कर्मचा-यांवरील खर्च | २,४३८ | ३,१२१ | ६८३ |
| २.२ | प्रशासन विषयक व सर्वसाधारण खर्च | ३१४ | ४६२ | १४८ |
| २.३ | दुरुस्ती व देखभाल यावरील खर्च | ६११ | ६११ | (०) |
| ३ | घसारा, घसाऱ्यासाठी घेतलेले अग्रीमसहीत | १,३०९ | १,२३५ | (७४) |
| ४ | दीर्घ मुदतीच्या कर्जाऊ भांडवलावरील व्याज | १,१२७ | १,२६६ | १३९ |
| ५ | खेळते भांडवल व ग्राहकांच्या सुरक्षा ठेवीवरील व्याज | ५५९ | ७१७ | १५८ |
| ६ | बुडित रकमेसाठीची तरतूद | ७५६ | ६८४ | (७२) |
| ७ | अन्य खर्च | ९ | १९ | १० |
| ८ | आयकर | - | ६५ | ६५ |
| ९ | पारेषण अनुज्ञप्तिधारकांस प्रदान केलेला पारेषण आकार | ३,१०५ | ३,१२८ | २३ |
| १० | आकस्मिक खर्चांसाठीच्या राखीव निधीची तरतूद | ६३ | - | (६३) |
| ११ | प्रोत्साहन / सवलत | १५७ | २३० | ७३ |
| **१२** | **एकूण महसुली खर्च** | **४७,६८६** | **४७,२६८** | **(४१९)** |
| १३ | भाग भांडवला वरील परतावा | ९८९ | १,२३४ | २४५ |
| **१४** | **एकूण महसूलाची गरज** | **४८,६७५** | **४८,५०२** | **(१७३)** |
| १५ | वजाः वीजदरा व्यतिरिक्त उत्पन्न | १,३७९ | १,४३० | ५१ |
| १६ | वजाः वहन आकारातून मिळालेले उत्पन्न | १८ | ३९ | २१ |
| १७ | वजाः ओपन ॲक्सेस चार्जेस पासूनचे उत्पन्न | ९ | १० | १ |
| १८ | अधिकः पुर्वकाळातील निव्वळ जमा/आकार | - | १३३ | १३३ |
| १९ | अधिकःआर.एल.सी .परतावा (नॉन पीडी ग्राहक) | ५०० | ४६२ | (३८) |
| २० | अधिकःआर.एल.सी .परतावा (पीडी ग्राहक) | १६६ | - | (१६६) |
| २१ | अधिकः अे.एस.सी. परतावा | - | (२) | (२) |

| अ. क्र. | तपशिल | आर्थिक वर्ष २०१२-१३ | | |
|---|---|---|---|---|
| | | (मान्य केल्याप्रमाणे) | (प्रत्यक्ष) | तफावत |
| २२ | आर्थिक वर्ष २००८-०९ साठी भांडवलीकरण | २२८ | २२८ | - |
| २३ | मा. विदयुत अपिलिय प्राधिकरण यांच्या आदेशाचा अतिरिक्त परिणाम | ४२७ | ४२७ | - |
| २४ | प्रकरण क्रमांक १००/२०११ मध्ये मान्य केलेली, परंतु वसुल न झालेली तुट | ४०५ | ४०५ | - |
| २५ | प्रकरण क्रमांक २१/२०१२ बाबत आदेशानुसार प्राप्तीच्या वाटपातून तात्पुरती रक्कम | ७५० | ७५० | - |
| २६ | आर्थिक वर्ष २०१०-११ ची मंजुर तुट | (७६७) | (७६७) | - |
| २७ | आर्थिक वर्ष २०११-१२ ची मंजुर तुट | १,४३० | १,४३० | - |
| **२८** | **किरकोळ दरापासून आवश्यक असणारा एकुण महसूल** | **५०,४०९** | **५०,०८९** | **(३२०)** |
| २९ | विद्यमान वीजदरांपासूनचा महसुल | ५०,४०९ | ४४,२८० | (६,१२९) |
| **३०** | **महसुलातील तुट** | **(०)** | **५,८०९** | **५,८०९** |

**ड) वीज खरेदी:-**

वीजेची गरज भागविण्यासाठी महावितरण सर्व उपलब्ध स्त्रोतांकडून वीज मिळविण्याचा प्रयत्न करते. आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ चे स्त्रोत निहाय प्रत्यक्ष वीज खरेदी खर्चाचा सारांश पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

| स्त्रोत | आर्थिक वर्ष २०११-१२ (प्रत्यक्ष) | | आर्थिक वर्ष २०१२-१३ (प्रत्यक्ष) | |
|---|---|---|---|---|
| | वीज खरेदी (दक्षलक्ष युनिट) | खर्च (रु. कोटी) | वीज खरेदी (दक्षलक्ष युनिट) | खर्च (रु. कोटी) |
| महानिर्मिती | ४३,०७५ | १३,१७८ | ४३,२८० | १७,००६ |
| एनटीपीसी | २०,०८२ | ५,२७२ | २३,४७१ | ५,७९९ |
| एनपीसीआयएल | ५,१२७ | १,१९७ | ४,९२४ | १,२३८ |
| एसएसपी (सरदार सरोवर) | १,१४८ | २३५ | ९७४ | २०० |
| पेंच | १४१ | २९ | १०८ | २२ |
| आरजीपीपीएल | ११,२२४ | ४,९६४ | ४,९०४ | २,१३३ |
| डॉडसन | १२५ | २९ | ८४ | २६ |
| व्यापारी | ६,४३९ | २,६२६ | ६,३१२ | २,४०४ |
| अपारंपारिक ऊर्जा | ४,४२५ | १,९३८ | ५,४८३ | २,३९० |
| सीपीपी | १,१०९ | ४७४ | १,७९८ | ८६२ |
| पॉवरग्रिड आणि इतर आकार | - | ७४१ | ० | १,००४ |
| युआय, एफबीएसएम आणि | ७९० | ३३२ | २६ | ९४ |

| स्त्रोत | आर्थिक वर्ष २०११-१२ (प्रत्यक्ष) | | आर्थिक वर्ष २०१२-१३ (प्रत्यक्ष) | |
|---|---|---|---|---|
| | वीज खरेदी (दक्षलक्ष युनिट) | खर्च (रु. कोटी) | वीज खरेदी (दक्षलक्ष युनिट) | खर्च (रु. कोटी) |
| आयबीएसएम | | | | |
| शुन्य भारनियमन | ४७६ | २१८ | - | - |
| मध्यम मुदतीची वीज खरेदी | २,६१४ | १,०८७ | ३,०६४ | १,२६६ |
| आयपीपी | १,८८७ | ६०१ | ४,६४१ | १,२८९ |
| **महावितरणची एकूण वीज खरेदी** | **९८,६६२** | **३२,९२०** | **९९,०६८** | **३५,७३०** |
| वजा:शुन्य भारनियमनासाठीची वीज | ४७६ | २१८ | | |
| **महावितरणने मागणी केलेली एकूण वीज खरेदी** | **९८,१८७** | **३२,७०२** | **९९,०६८** | **३५,७३०** |

### ई) वीज विक्री (दशलक्ष युनिट)

आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी वर्गवारी निहाय वीज विक्री पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

**(दशलक्ष युनिट)**

| प्रवर्ग | आर्थिक वर्ष २०११-१२ | | आर्थिक वर्ष २०१२-१३ | |
|---|---|---|---|---|
| | आयोगाने मान्य केलेले | प्रत्यक्ष | आयोगाने मान्य केलेले | प्रत्यक्ष |
| घरगुती | १३१०३ | १३०९९ | १५१४९ | १४४३९ |
| वाणिज्यिक व सार्वजनिक सेवा | ५०८९ | ५०६७ | ६०९८ | ६०३५ |
| उच्चदाब - औद्योगिक | २५५४५ | २५०७४ | २८४३५ | २५२५३ |
| लघुदाब - औद्योगिक | ५००३ | ४९५७ | ५३४७ | ५००२ |
| सार्वजनिक पाणी पुरवठा योजना | १६५८ | १७०६ | १७२७ | १८२१ |
| पथदिवे | ८३१ | ९३४ | ८३१ | ११५९ |
| कृषि | २२०३६ | २१६४३ | २२०५४ | २०८९१ |
| रेल्वे | १३४४ | १३२५ | १४६० | १४७७ |
| एकगठ्ठा पुरवठा | २७२ | २७१ | ३२८ | २५१ |
| क्रेडिट विक्री व ओपन ॲक्सेस | - | ४९५ | - | १२२९ |
| इतर | ६६ | ६२ | ७५ | ५८ |
| वितरण फ्रॅचायझी (इनपूट लेव्हलवर) | ६३७१ | ६९३६ | ८०५२ | ७६०४ |
| **एकूण** | **८१३१८** | **८१५६८** | **८९५५६** | **८५२१८** |

**फ़) महसूल**

आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी वर्गवारी निहाय महसूल पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

**(रु. कोटी)**

| प्रवर्ग | आर्थिक वर्ष २०११-१२ | | आर्थिक वर्ष २०१२-१३ | |
|---|---|---|---|---|
| | आयोगाने मान्य केलेले | प्रत्यक्ष | आयोगाने मान्य केलेले | प्रत्यक्ष |
| घरगुती | ५६९६ | ५८०० | ७४०८ | ७२३० |
| वाणिज्यिक व सार्वजनिक सेवा | ४३६४ | ४५९४ | ५७३४ | ५६२४ |
| उच्चदाब - औद्योगिक | १५६४३ | १६१२२ | २०१३८ | १५६११ |
| लघुदाब - औद्योगिक (यंत्रमागासह) | ३२१६ | ३०९३ | ३८४२ | ३५३८ |
| सार्वजनिक पाणी पुरवठा योजना | ६८१ | ६९५ | ८१७ | ७९५ |
| पथदिवे | ३५१ | ३८५ | ३८८ | ५५५ |
| कृषि | ४४३१ | ४६४१ | ५३२७ | ५३६६ |
| रेल्वे | ९५२ | १००९ | ११४१ | ११५० |
| एकगठ्ठा पुरवठा (ग्रुप हॉऊसिंग सोसा.) | १३६ | १२७ | १७८ | १५६ |
| इतर | ८८ | २४९ | ११५ | २२२ |
| वितरण फ्रॅचायझीं | २१८१ | २४३० | ३४४१ | ३६१३ |
| स्टॅंडबाय आकार | ३९६ | ३९७ | ३९६ | ४१९ |
| अतिरिक्त इंधन समायोजन आकार | - | - | १४८३ | - |
| **एकूण** | **३८१३५** | **३९५४२** | **५०४०८** | **४४२७९** |

**ग) ऊर्जा संतुलनः**

प्रत्यक्ष वीज खरेदी, वीज विक्री, पारेषण व वितरण हानी यांच्या आधारे महावितरणने आर्थिक वर्ष २०११-१२ आणि आर्थिक वर्ष २०१२-१३ साठीच्या ऊर्जा संतुलनाची परिगणना केली आहे. आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी वर्गवारी निहाय ऊर्जा संतुलनाचा तपशिल पुढील तक्त्यात दर्शविला आहे.

| तपशील | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०११-१२ | आर्थिक वर्ष २०१२-१३ |
| **महाराष्ट्रांतर्गत** | | |
| महानिर्मितीकडून केलेली वीज खरेदी | ४३,०७५ | ४३,२८० |
| एनपीसीआयएल तारापूर | ३,९३५ | ३,८४० |
| अन्य स्त्रोतांकडून व मध्यम कालीन वीज खरेदी | २१,३७८ | १७,५२८ |
| शुन्य भारनियमन | २७१ | - |
| व्यापारी | ३,५४१ | ६,३१२ |
| आयबीएसएम + एफबीएसएम | ५४ | २६ |
| महावितरणच्या प्रणालीतील अन्य वितरण | १,५९९ | ३,८०४ |

| तपशील | प्रत्यक्ष | प्रत्यक्ष |
|---|---|---|
| | आर्थिक वर्ष २०११-१२ | आर्थिक वर्ष २०१२-१३ |
| परवानाधारकांची वीज | | |
| युआय | ७३६ | - |
| **महाराष्ट्रांतर्गत एकूण वीजखरेदी** | **७४,५९०** | **७४,७९०** |
| **महाराष्ट्रा बाहेरील** | | |
| केंद्रीय विद्युत निर्मिती केंद्र + एनपीसीआयएल + युएमपीपी +केस १ +सरदार सरोवर+पेंच | २२,५७० | २८,०८२ |
| व्यापारी | २,८९८ | - |
| शुन्य भारनियमन | २०५ | - |
| **महाराष्ट्रा बाहेरील एकूण वीजखरेदी** | **२५,६७२** | **२८,०८२** |
| आंतरराज्य पारेषण हानी | ४.१०% | ४.२५% |
| महाराष्ट्राच्या परिसीमेवर उपलब्ध एकूण वीज | २४,६२० | २६,८८८ |
| देय असलेली एकूण वीज खरेदी | १००,२६१ | १०२,८७२ |
| **पारेषण परिसिमेवरील उपलब्ध असलेली एकूण वीज** | **९९,२१०** | **१०१,६७८** |
| **वितरण परिसीमेवर उपलब्ध वीज** | | |
| राज्यातंर्गत हानी | ४.२९% | ४.२४% |
| वितरण परिसिमेवरील ३३ केव्ही व त्यावरील पातळीवर उपलब्ध वीज | ९४,९५३ | ९७,३६७ |
| ३३ केव्ही वाहिनीवरुन अंतक्षेपित करुन ३३ केव्ही वाहिनीवरच वापर झालेली वितरण परिसिमेवरील वीज | ४८० | ४७९ |
| वितरण परिसिमेवर उपलब्ध वीज | ९५,४३३ | ९७,८४६ |
| वितरण हानी (%) | १६.०३% | १४.६७% |
| वितरण हानी (युनिट) | १५,२९८ | १४,३५८ |
| **विक्रीसाठी उपलब्ध वीज** | **८०,१३२** | **८३,४८८** |

महावितरणने गेल्या काही वर्षात वितरण हानी लक्षणीय रित्या कमी करण्यात यश मिळविले आहे. महावितरणचे सदर वितरण हानी कमी करण्याचे प्रयत्न यापुढेही चालू रहातील किंबहुना त्यात वाढ करण्यात येईल. तथापि, वितरण हानी कमी करणे ही अत्यंत धीम्या गतीने साध्य होणारी प्रक्रिया असून एका ठराविक पातळीनंतर त्यामुळे अधिक घट करणे अत्यंत अवघड होते. महावितरणची आर्थिक वर्ष २०११-१२ साठीची वितरण हानी १६.०३ % व आर्थिक वर्ष २०१२-१३ साठी वितरण हानी १४.६७% होती.

**घ) एकूण महसूली तुटीचा सारांश**

आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ करीताचे अंतिम अचूक समायोजन व कॅरींग कॉस्टचा विचार करता एकूण महसूली तुट ही रू.**९,३१२** कोटी इतकी आहे.

| तपशिल | रुपये कोटी |
|---|---|
| आर्थिक वर्ष २०११-१२ व २०१२-१३ साठीची एकूण महसूली तुट | ६,९४५ |
| पूर्वीच्या प्रलंबित वसूलीची कॅरींग कॉस्ट | १,०५१ |
| आर्थिक वर्ष २०११-१२ व २०१२-१३ साठीच्या अंतिम अचूक समायोजनावरील कॅरींग कॉस्ट | १,३१७ |
| **एकूण महसूल तुट (आधिक्य)** | **९,३१२** |

*सदर महसूली तुट ही मा. आयोगाच्या दि.०४ व ०५ सप्टेंबर २०१३ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिलेल्या रू.२८५ कोटी प्रती महिना वसूलीच्या व्यतिरिक्त आहे.

**च) प्रस्तावित अतिरिक्त विद्युत आकार**

- महावितरण असे प्रस्तावित करू इच्छिते की, महसूली तुटीची वसूली ही वर्गवारी निहाय सरासरी देयक दराच्या प्रमाणात करण्यात यावी. तथापि, आर्थिक वर्ष २०१३-१४ करीताचे सुधारीत सरासरी देयक दर अद्याप उपलब्ध नसल्याने महावितरणतर्फे मा. आयोगाने दि.१६ ऑगस्ट २०१२ (प्र.क्र.१९/२०१२) च्या आदेशाद्वारे आर्थिक वर्ष २०१२-१३ करीताचे निर्धारीत केलेले सरासरी देयक दर वापरून अतिरिक्त विद्युत आकाराची परिगणना करण्यात आली आहे.
- आर्थिक वर्ष २०११-१२ व २०१२-१३ करीताचे अचूक समायोजन व कॅरींग कॉस्ट संदर्भात निर्माण झालेली रू.९,३१२ कोटीच्या महसूली तुटीची वसूली अतिरिक्त विद्युत आकार-१ (ए.ई.सी.-१) द्वारे वसूल करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. या व्यतिरिक्त महानिर्मिती व महापारेषण करीता मा. आयोगाने या पूर्वीच म्हणजेच सप्टेंबर २०१३ च्या आदेशाद्वारे मान्यता दिलेल्या रू.२८५ कोटी प्रति महिना रकमेची वसूली अतिरिक्त आकार-२ (ए. ई.सी.-२) द्वारे करण्यात येईल.
- महावितरण असे प्रस्तावित करू इच्छिते की, अतिरिक्त विद्युत आकार (ए.ई.सी.-१ व ए.ई.सी.-२) हे मा. आयोगाने दि.१६ ऑगस्ट २०१२ (प्र.क्र.१९/२०१२) रोजीच्या आदेशाद्वारे मान्यता दिलेल्या विद्युत आकाराव्यतिरिक्त राहील. महसूली तुटीच्या वसूलीसाठी प्रस्तावित केलेल्या आणि यापूर्वीच महानिर्मिती / महापारेषणसाठी मान्य केलेली रक्कमांच्या अनुषंगाने अतिरिक्त विद्युत आकारांचा तपशिल पुढील तक्त्यात दर्शविलाआहे.

| प्रवर्ग | अतिरिक्त वीज आकार-१ समायोजन (पैसे /युनिट) | अतिरिक्त वीज आकार-२* सप्टेंबर २०१३ च्या आदेशांनुसार (पैसे /युनिट) | एकूण अतिरिक्त वीज आकार (पैसे /युनिट) |
|---|---|---|---|
| **उच्चदाब प्रवर्ग** | | | |
| **उच्चदाब १ औद्योगिक** | | | |
| उच्चदाब १ अविरत उद्योग | १६२ | ५९ | २२१ |

| प्रवर्ग | अतिरिक्त वीज आकार-१ समायोजन (पैसे /युनिट) | अतिरिक्त वीज आकार-२* सप्टेंबर २०१३ च्या आदेशांनुसार (पैसे /युनिट) | एकूण अतिरिक्त वीज आकार (पैसे /युनिट) |
|---|---|---|---|
| (एक्सप्रेस फिडर्स) | | | |
| उच्चदाब १ अविरत नसलेले उद्योग (नॉन एक्सप्रेस फिडर्स ) | १५३ | ५६ | २०९ |
| उच्चदाब १ हंगामी | १८७ | ६९ | २५६ |
| **उच्चदाब २- वाणिज्य** | | | |
| एक्सप्रेस फिडर | २४४ | ९० | ३३३ |
| नॉन एक्सप्रेस फिडर | २३१ | ८५ | ३१६ |
| **उच्चदाब -३ रेल्वे** | १६४ | ६० | २२५ |
| **उच्चदाब-४ सार्वजनिक पाणीपुरवठा** | | | |
| एक्सप्रेस फिडर | ११७ | ४३ | १६० |
| नॉन एक्सप्रेस फिडर | १२१ | ४४ | १६५ |
| **उच्च्दाब -५ कृषी** | ६५ | २४ | ८९ |
| **उच्च्दाब -६ एक गठ्ठा पुरवठा** | ११४ | ४२ | १५६ |
| **उच्च्दाब -८ तात्पुरता पुरवठा** | ३२८ | १२० | ४४८ |
| **उच्च्दाब -९ सार्वजनिक सेवा** | | | |
| एक्सप्रेस फिडर | १९६ | ७२ | २६९ |
| नॉन एक्सप्रेस फिडर | १८५ | ६८ | २५३ |
| घरगुती (लघुदाब-१) | | | |
| दारिद्रय रेषेखालील (०-३० युनिट ) | २५ | ९ | ३४ |
| १-१०० युनिट | ८२ | ३० | ११२ |
| १०१-३०० युनिट | १३८ | ५१ | १८८ |
| ३०१-५०० युनिट | १७२ | ६३ | २३५ |
| ५०१-१००० युनिट | १८७ | ६९ | २५५ |
| १००० युनिट पेक्षा जास्त | २०० | ७३ | २७३ |
| बिगर घरगुती (लघुदाब -२) | | | |
| ०-२० के डब्ल्यू | | | |
| ०-२०० युनिट | १४९ | ५५ | २०३ |
| २०० युनिट पेक्षा जास्त | २२९ | ८४ | ३१३ |
| >२०-५० के डब्ल्यू | २१३ | ७८ | २९१ |
| >५० के डब्ल्यू | २६५ | ९८ | ३६३ |
| सार्वजनिक पाणी पुरवठा (लघुदाब-३) | | | |
| ० -२० केडब्ल्यू | ५८ | २१ | ७९ |
| २०-४० के डब्ल्यू | ७३ | २७ | १०० |
| ४०-५० के डब्ल्यू | ९९ | ३७ | १३६ |
| शेती (लघुदाब-४) | | | |
| मीटर रहितचा दर | | | |

| प्रवर्ग | अतिरिक्त वीज आकार-१ समायोजन (पैसे /युनिट) | अतिरिक्त वीज आकार-२* सप्टेंबर २०१३ च्या आदेशांनुसार (पैसे /युनिट) | एकूण अतिरिक्त वीज आकार (पैसे /युनिट) |
|---|---|---|---|
| वार्षिक >१३१८ तास/अ.श./ वर्ष वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे | | | |
| ० -५ एचपी (रू./अ.श./महिना) | ६० | २२ | ८२ |
| ५ एचपी पेक्षा अधिक (रू./अ.श./महिना) | ६० | २२ | ८२ |
| वार्षिक <१३१८ तास/अ.श./ वर्ष वापराचे प्रमाण असलेली परिमंडळे | | | |
| ० -५ एचपी (रू./अ.श./महिना) | २८ | १० | ३८ |
| ५ एचपी पेक्षा अधिक (रू./अ.श./महिना) | २८ | १० | ३८ |
| मीटरचे दर (कुक्कुटपालन सहीत) | ४४ | १६ | ६० |
| लघुदाब उदयोग (लघुदाब-५) | | | |
| ० - २० केडब्ल्यू | ११२ | ४१ | १५३ |
| २० केडब्ल्यू पेक्षा अधिक | १७९ | ६६ | २४५ |
| पथदिवे (लघुदाब ६) | | | |
| ग्रामपंचायती, अ, ब आणि क वर्गातील नगरपरिषद | ९३ | ३४ | १२७ |
| महानगरपलिका क्षेत्र | १०७ | ३९ | १४६ |
| तात्पुरती जोडणी (लघुदाब-७) | | | |
| तात्पुरती जोडणी (अन्य प्रयोजन) | ३२८ | १२० | ४४८ |
| तात्पुरती जोडणी (धार्मिक प्रयोजन) | ८५ | ३१ | ११६ |
| जाहिराती व होर्डींग (लघुदाब-८) | ४९१ | १८० | ६७२ |
| स्मशानभुमी व दफनभुमी (लघुदाब-९) | ७८ | २९ | १०७ |
| लघुदाब -१० सार्वजनिक सेवा | | | |
| ०-२०० युनिटस | ११७ | ४३ | १६० |
| >२०० युनिटस | १७५ | ६४ | २४० |
| >२०- ५० केडब्ल्यू | १९९ | ७३ | २७२ |
| >५० केडब्ल्यू | २१० | ७७ | २८६ |

* अतिरिक्त वीज आकार - २ हा मा. आयोगाने सप्टेंबर २०१३ मधील आदेशानुसार या पूर्वीच मान्य केलेल्या रक्कमेच्या अनुषंगाने आहे.

**छ) महाविरतणचे अतिरिक्त प्रस्ताव**

- महावितरण असे नमूद करू इच्छिते की, महावितरण सध्या अत्यंत खडतर अशा आर्थिक स्थितीतून जात असून परिणामी महावितरणला वित्तीय संस्थाकडून अल्प मुदतीचे कर्ज घ्यावे लागत आहे. तसेच वीज निर्माते / कंत्राटदार / कर्मचारी इत्यादींची देणी थकीत झाली आहेत.

- मा. आयोगाने जरी आर्थिक वर्ष २०१२-१३ करीताच्या वीजदर आदेशा संबंधि महावितरणच्या पुनर्विचार याचीके संदर्भात काही देणी मान्य केली असली तरी मा. आयोगाने सदर वसूलीस वेळीच परवानगी न देता आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या अंतिम अचूक समायोजन याचिकेबाबतच्या निर्णया पर्यंत प्रलंबित ठेवल्याने आर्थिक दृष्टया आधीच कमकुवत असणाऱ्या महावितरणवर अतिरिक्त बोजा पडला.
- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय विजदर) विनियम २०११ च्या तरतुदीनुसार व्यावसायिक आराखडयाच्या मान्यतेनंतर महावितरणने आर्थिक वर्ष २०१३-१४ ते आर्थिक वर्ष २०१५-१६ या कालावधीकरीता बहुवर्षीय विजदर याचिका दाखल करणे अपेक्षित होते. तथापि, महावितरण येथे असे नमूद करू इच्छिते की, महावितरणच्या व्यावसायिक आराखडा संबंधी याचिका (प्र.क्र.१३४/२०१२) संदर्भात मा. आयोगाने ऑगस्ट २०१३ रोजी निर्णय दिला. त्यामुळे महावितरणला दि.०१ एप्रिल २०१३ पासून सुधारित विजदर लागू करता आले नाहीत. यामुळे सुध्दा आर्थिक दृष्टया कमकुवत असणाऱ्या महावितरणवर अतिरिक्त बोजा पडला.
- मा. आयोगाने दि.२६ ऑगस्ट २०१३ रोजी व्यावसायिक आराखडा संबंधी दिलेल्या आदेशात महावितरणला दुसऱ्या कालावधीकरीता बहुवर्षीय विजदर याचिका प्रस्तावित करण्यासाठी मान्यता प्राप्त व्यावसायिक आराखडा याला प्रमाण मानण्यात यावे असा आदेश दिला. तसेच मा. आयोगाने व्यावसायिक आराखडा मान्यतेच्या आदेशानंतर ६० दिवसांच्या आत बहुवर्षीय विजदर याचिका सादर करण्याचे आदेश दिले. तथापि, व्यावहारीक अडचणी, विविध प्रलंबित विजदरासंबंधिच्या याचिका, प्रस्तावित कायदयातील बदल आणि विविध न्यायप्रविष्ट प्रकरणे जसे आर.जी.पी.पी.एल. करीताचा स्थिर आकारा पोटीची देणी इत्यादींचा विचार करता महावितरणला द्वितीय नियंत्रण कालावधीकरीता बहुवर्षीय विजदर याचिकेसाठी एकूण महसूलाच्या गरजेचा अंदाज बांधणे अत्यंत कठीण आहे.
- सध्या भारतात विद्युत क्षेत्रात असलेल्या अनिश्चित परिस्थितीमुळे विज खरेदी, विज विक्रीबाबत व परिणामी एकूण आर्थिक महसूलाचे योग्य अनुमान करण्यासंदर्भातील अडचणी विचारात घेऊन महावितरणने मा. आयोगाला पत्र क्र. SE/TRC/MYT FY १३-१६/२२५८ दि.२२ जानेवारी २०१४ द्वारे द्वितीय नियंत्रण कालावधीसाठी बहुवर्षीय याचिका सादर करण्यासंबंधी १ वर्षाकरीताची मुदतवाढ मागितली आहे.
- महावितरण येथे असे नमूद करू इच्छिते की, सप्टेंबर २०१३ दरम्यान मा. आयोगाने महानिर्मिती व महापारेषण संबंधीच्या रकमेपोटी रू.५३४२ कोटी वसूलीस मान्यता दिली. सदर वसूलीत महावितरणचा कोणताही आर्थिक वाटा नाही. सुधारीत विजदर निश्चितीकरण्याच्या विलंबामुळे महावितरणसाठी गेल्या २ वर्षात वीजदरात सुधारणा झालेली नाही. त्यामुळे महावितरण सध्या अत्यंत खडतर अशा आर्थिक स्थितीत असून सदर याचिका लवकरात लवकर निकाली काढण्यात यावी. जेणेकरून महावितरणला आर्थिक दृष्टया तग धरणे शक्य होईल.
- महावितरण येथे असेही नमूद करू इच्छिते की, मा. आयोगाने तात्पुरता निश्चित केलेल्या कृतिचे मानके विनियमामध्ये नमुद असलेल्या विद्युतभाराच्या पातळीपेक्षा कमी पातळीवर विद्युत पुरवठा मंजूरी / जोडणी देणे हे केवळ असामान्य परिस्थितीतच व केवळ तात्पुरता उपाय म्हणूनच देता येते. महावितरण असे नमुद करू इच्छिते की, सध्याच्या अस्तित्वातील मंजूर भाराच्या बिलींग डिमांड संदर्भात अंमलबजावणीच्या तरतुदीत बदल होणे गरजेचे आहे.

- महावितरण येथे असे नमूद करू इच्छिते की, उपरोक्त नमुद मुद्दे हे महावितरणच्या अस्तित्वासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. यामुळे महावितरण मोठया प्रमाणात महसूलास मुकत आहे. तसेच मा. आयोगाने निर्देशित केलेल्या विविध आदेशांबाबत महावितरणद्वारे परिपूर्ती करण्यात येत आहे. तथापि, काही मुद्दे हे विजदर निश्चितीकरणाच्या प्रक्रियेशी संबंधित असल्यामुळे महावितरण येथे नमुद करू इच्छिते की, सदर मुद्दयांबाबत अधिक खुलासा बहुवर्षीय विजदर याचिकेच्या कार्यवाही दरम्यान करण्यात येईल.

**ज) अंतरिम सहाय्य**

- सध्याच्या बिकट अशा आर्थिक स्थितीचा विचार करता महावितरण मा. आयोगास अशी विनंती करू इच्छिते की, विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ९४ (२) मधील तरतुदीनुसार महावितरणला आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ च्या अंतिम अचूक समायोजनापोटी अंतरिम सहाय्यास मान्यता देण्यात यावी. महावितरण असे ही नमूद करू इच्छिते की, अंतरिम सहाय्य हे वीज खरेदी खर्च व महसूल यामधील तफावत व कॅरींग कॉस्ट संदर्भात आहे. महावितरण असे ही नमूद करू इच्छिते की, सदर तफावत ही महावितरणच्या नियंत्रणाच्या बाहेर आहे.
- तसेच महावितरण नम्रपणे मा. आयोगास विनंती करू इच्छिते की, आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ करीता अंतिम अचूक समायोजना संदर्भात अंतिम आदेश येई पर्यंत विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ९४ (२) मधील तरतुदीनुसार प्रस्तावित महसूली तुटीच्या कमीतकमी ७५% इतक्या अंतरिम सहाय्यास मान्यता देण्यात यावी.

**झ) प्रार्थना**

महावितरण नम्रपणे मा. आयोगास प्रार्थना करू इच्छिते की,

१. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (अटी व शर्ती) अधिनियम, २००५ नुसार आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ करीता अंतिम अचूक समायोजनासाठीची याचिका ताबडतोब दाखल करून घेण्यात यावी.

२. महावितरणने प्रस्तावित केलेल्या आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ करीता अंतिम अचूक समायोजनास मान्यता देण्यात यावी.

३. महावितरणने प्रस्तावित केलेल्या आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ करीता अंतिम अचूक समायोजन संदर्भातील कॅरींग कॉस्टला मान्यता देण्यात यावी.

४. महावितरणला सदर महसूली तुट प्रस्तावित अतिरिक्त आकार-१ द्वारे विविध ग्राहक वर्गवारींकडून वसूल करण्यास परवाणगी देण्यात यावी.

५. अतिरिक्त आकार-१ व २ विचारात घेऊन महावितरणने परिगणना केलेल्या क्रॉस सबसिडी सरचार्जला मान्यता दयावी. सदर सरचार्ज सध्याचे तसेच नविन मुक्त प्रवेश (ओपन ॲक्सेस) ग्राहकांना लागू असेल.

६. आर्थिक वर्ष २०११-१२ व आर्थिक वर्ष २०१२-१३ करीता अंतिम अचूक समायोजना संदर्भात अंतिम आदेश येई पर्यंत विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ९४ (२) मधील तरतुदीनुसार प्रस्तावित महसूली तुटीच्या कमीतकमी ७५% इतक्या अंतरिम सहाय्यास मान्यता देण्यात यावी.

७. मा. आयोगास योग्य वाटेल असे कोणतेही अन्य सहाय्य देण्यात यावे.

८. मा. आयोगास योग्य वाटेल असे अन्य कोणतेही आदेश, प्रकरणातील परिस्थिती व न्यायहिताच्या दृष्टीने देण्यात यावेत.

९. कोणतीही चूक / भुल झाली असल्यास ती क्षमापित करावी आणि ती सुधारण्याची संधी देण्यात यावी.

१०. सदर याचिका सादर कर्त्यास या अर्जात कालानुरूप कोणतीही भर टाकणे किंवा त्यात बदल करणे तसेच अतिरिक्त विनंती अर्ज सादर करण्याची परवानगी मिळावी.

**********************